" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " कर्मवीर



रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर



# रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी

दिनांक – २०/१२/२०२५

## " रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी " कार्यान्वित अहवाल

रयत शिक्षण संस्थेच्या परिपत्रक क्रमांक ३८ दिनांक १५/११/२०२५ नुसार महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समितीची मा.प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमीच्या स्थापने बाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. या वेळी ॲकॅडमीच्या समन्वयक पदाची जबाबदारी प्रा.समाधान संदिपान बनसोडे (सहा.प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग ) यांच्यावर सोपविण्यात आली. महाविद्यालयात सध्या अभ्यासिका कार्यरत असून तेथे विद्यार्थ्यांना स्वतंत्र बैठक व्यवस्था (स्टडी रूम), इंटरनेट सुविधेसहित प्रत्येक विद्यार्थांना स्वतंत्र संगणक कक्ष, स्वतंत्र ग्रंथालय उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त परिपत्रकात सांगितलेल्या आवश्यक भौतिक सुविधा निर्माण करण्याचे ठरले.

शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमीच्या उद्घाटनाचा सोहळा पार पडला. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून करवीरच्या उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी मा. श्रीमती मोसमी चौगुले उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते " रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमीचे उद्घाटन " आणि महाविद्यालयाच्या परिसरातील प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या जीवनपटाची माहिती देणाऱ्या डिजिटल फलकाचे अनावरण करण्यात आले.

प्रमुख पाहुणे करवीरच्या उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी मा. श्रीमती मोसमी चौगुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मत व्यक्त केले की कोणत्याही स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत असताना आपणास ज्या विषयामध्ये रुची आहे असे विषय निवडा आणि अभ्यासाला प्रारंभ करा. त्याचा सर्वोत्तम सराव करा. तो सराव तुम्हाला यशाकडे घेवून जाणार असतो. योग्य वेळ, योग्य रस्ता, योग्य मार्गदर्शन आणि तुम्ही त्यासाठी घेत असलेले कष्ट यातून तुमचे स्पर्धा परीक्षेचे स्वप्न साकार होईल.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र.प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर.भोसले यांनी अध्यक्षीय मनोगतात सांगितले की अनेकदा स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत असताना अपयश येत असते. अपयशाने खचू नका. त्यासाठी एखाद्या छंदाशी मैत्री करा. केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी महाविद्यालयात तज्ज्ञ मार्गदर्शक, प्रशस्त वर्ग व सुसज्ज ग्रंथालय उपलब्ध आहे. तरी कोल्हापूर व कोल्हापूर परिसरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवक युवतींनी याचा लाभ असे आवाहन त्यांनी केले. सदर व्याख्यानास ९३ विद्यार्थी व १४ शिक्षक उपस्थित होते.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

प्र. प्र. प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर

'' स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद '' कर्मवीर





रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

## रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी

### " रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी " उद्घाटन फोटो



" रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी " अभ्यासिकीचे उद्घाटन मा.मोसमी चौगले, मा.प्र.प्राचार्य प्रो.डॉ.डी.आर.भोसले



" रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी " अभ्यासिकीची पाहणी करताना मा.मोसमी चौगुले,
मा.प्र.प्राचार्य प्रो.डॉ.डी.आर.भोसले व इतर मान्यवर

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR